**रे.दि.मु.क्र.१६७/२०११**
**राजु वसंत थोरवडे**
**वि.**
**यशवंत जाधव वगैरे**

**रे.दि.मु.नं. १६७/२०११ मधील निशाणी १३९ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र ३ब १, ३ब २, ३ब ३, ३क १, ३ड यांचेविरुद्ध "कैफियत नाही" हा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करणेची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र ३ब १, ३ब २, ३ब ३, ३क १,३ड यांचे म्हणण्यानुसार, मयत प्रतिवादी क्र ३ यांनी दि. २६.०९.२०११ रोजी कैफियत दाखल केलेली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र १ वगैरे यांनी मुंबई उच्च न्यायालयात दिवाणी रिव्हीजन अर्ज क्र. १०५३/२०१४ अपिल दाखल केले होते. त्यामुळे मुंबई येथील वकीलांकडे प्रतिवादीने दाव्याची कागदपत्रे दिली होती. दरम्यान प्रतिवादी क्र ३ मयत झाल्याने वारस नोटीस आल्यानंतर कागदपत्रे उपलब्ध झाली नाही. त्यामुळे समन्स मिळालेपासुन मुदतीत कैफियत देता आली नाही. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध कैफियत नाही चा आदेश झालेला आहे. प्रतिवादीविरुद्ध विनाकैफियत दावा चालवलेस त्यांचे अपरिमित नुकसान होणार असुन न्याय हक्कास बाधा येणार आहे. सबब प्रतिवादींविरुद्ध झालेला कैफियत नाहीचा आदेश रद्द करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादी यांनी म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज खोटा व लबाडीचा असलेने तो वादीस मान्य व कबुल नाही. प्रतिवादींनी अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तिक नाही त्यामुळे अर्ज नामंजुर करणेत यावा. यदाकदाचित अर्ज मंजुर करावा या निर्णयाप्रत न्यायालय आल्यास प्रतिवादींना रक्कम रुपये १,०००/– कॉस्ट करणेत यावी अशी विनंती केली आहे.

४. वादीने सदरचा दावा जाहिर ठराव, हुकुमी ताकीदीकरीता व अतिक्रमीत क्षेत्र पुर्ववत होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी ३ब १, ३ब २, ३ब ३, ३क १,३ड हे दाव्याकामी हजर झाले परंतु त्यास कैफियत

दाखल करण्यास साधारणतः ४ महिन्यांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादींनी सदर विलंबाचे स्पष्टीकरण म्हणुन अन्य अर्ज व अपिल प्रलंबित असल्याचे सांगितले. तसेच त्याकरीता प्रतिज्ञापत्र (**नि.१४०**) दाखल केलेले आहे. प्रतिवादींना सदर अर्ज करण्याकरीता जवळजवळ ४ महिन्यांचा विलंब झालेला आहे. असे असले तरी दावा गुणदोषावर चालविण्यासाठी व दाव्याच्या निर्णयासाठी प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. कैफियत दाखल करुन घेतले नाहीतर त्यांचे अपिरिमित असे नुकसान होईल. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातुन त्यांना त्यांची बाजु मांडण्यासाठी कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य राहील. तथापि, सदर विलंबामुळे दाव्याच्या प्रगतीस विलंब झाला आहे. त्यामुळे त्यांच्यावर खर्च लादून कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे योग्य राहील. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र ३ब १, ३ब २, ३ब ३, ३क १,३ड यांचा निशाणी १३९ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. त्यांच्यावर एकत्रितरीत्या खर्च रक्कम रुपये ५००/–(पाचशे रुपये मात्र) लादून कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो व कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

३. खर्चाची रक्कम वादीला अदा केल्यानंतर प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

Digitally signed by PRAJAKTA GAJANAN SHELAR
Date: 2025.02.01 16:55:08 +0530

स्थळ – कराड (पी. जी. शेलार)

दिनांक–०१.०२.२०२५ ६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कराड